<u>अमरावती महानगरपालिका ,अमरावती</u>

<u>दिनांक ३०.१.२०२४ रोजीचा प्राप्त प्रशासकीय विषय</u>

**(प्रशासकीय विषय)**

**<u>विषय क्रमांक १५६</u> -** **मौजा वडद सर्व्हे क्र. १८/२ अमरावती मधील सार्वजनिक वापराची जागा अध्यक्ष खाटीक समाज परिवर्तन संघटना, अमरावती रजि.नं. महा/४०८/१९ यांनी व्यायामशाळा व ग्रंथालय सुरु करण्याकरीता देण्याबाबत.**

**<u>ठराव क्रमांक १५६</u> -** मौजा वडद सर्व्हे नं. १८/२ अमरावती या जागेचा अभिन्यास महानगरपालिकेकडून मंजुर आहे. या अभिन्यासामध्ये २९२८० चौ. मी. जागा वाचनालय व व्यायामशाळा सुरु करण्याकरीता अध्यक्ष खाटीक समाज परिवर्तन संघटना, अमरावती रजि.नं. महा/४०८/१९ यांनी दि. २७/०६/२०२३ रोजीच्या अर्जानुसार मागणी केलेली आहे.

सदर परवानगीबाबत स्थानिक नागरिकांच्या हरकती संबंधात जाहिर सुचना जनमाध्यम/दैनिक लोकपथ मध्ये दि. २५/०८/२०२३ ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच अर्जदार संस्थेने जाहीर सुचनेचे प्लेक्स प्रस्तावित जागेच्या दर्शनिय भागात लावून प्रसिध्द केलेला आहे. विहित मुदतीस कुठलीही हरकत प्राप्त झालेली नाही.

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०४ दि. १६/०३/२०२१ अन्वये मंजुर झालेल्या धोरणानुसार सदर प्रकरणी खालील प्रमाणे छाननी करण्यात आलेली आहे.

१) सदर अभिन्यासा भुखंडधारकांचेसंमती पत्र (नोटरी ) सादर केलेले आहे.
२) सार्वजनिक वापराच्या जागेचे क्षेत्र २७२१.२८ चौ.मि.(२९२८० चौ.फुट ) आहे. त्यापैकी २९२७.९० चौ.फुट(२७२.११ चौ.मि.) जागा व्यायामशाळा व वाचनालयाचे वापराकरीता देण्याचे प्रस्तावित आहे.
३) संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदणी क्र.महा/४०८/१९ अमरावती नोंदणकृत संस्था आहे.
४) आवेदक संस्थेने सन २०२१ व २०२२ चे ऑडीट रिपोर्ट सादर केलेला आहे.
५) प्रस्तावित जागा सावर्जनिक वापराच्या जागेच्या एका कडेला प्रस्तावित करण्यात आली आहे .
६) सदर जागेवर मनपाने बगीचा अथवा क्रिडांगण विकसित केलेले नाही.
७) आवेदक संस्थेस सदर जागा प्रथम ३ वर्षाकरीता देण्यात येईल.३ वर्षात विकास केल्यास पुढील १० वर्षाकरीता मुदत वाढ देण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रकरणी सार्वजनिक वापराचे जागेचे पैकी २७२.११ चौ.मि.जागा व्यायामशाळा व वाचनालयाचे वापराकरीता देण्याचे प्रस्तावित आहे. मंजुर धोरणानूसार भुयारी गटार अधिभार रु.१०,०००/-व ट्री गार्ड शुल्क रु.१०,०००/-आणि जमिन वापर मुल्य रु.१,४९,६६५/-असुन जमिन वापर मुल्याचा १% वार्षिक भाडे रु. १४९७/-प्रति वर्षाप्रमाणे आकारणी करुन परवानगी देण्याच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणेबाबत मा.आयुक्त यांनी दि.११/०१/२०२४ ला मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेत मंजरीस्तव सादर करण्यात आला आहे.परंतु सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजूर व कायम

**स्वा./-**
**नगर सचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.